पुढारी MY कोल्हापूर शुक्रवार, १ नोव्हेंबर २०२४

# विवेकानंद कॉलेजला 'नॅक'कडून ए-प्लस ग्रेड प्राप्त

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या विवेकानंद कॉलेजला (अधिकारप्रदत्त स्वायत्त) राष्ट्रीय मूल्यांकन व प्रत्यायन परिषदेकडून (नॅक) ए-प्लस ग्रेड प्राप्त झाला आहे.

विवेकानंद कॉलेजने गुणवत्तेमध्ये वाढ करून नॅकच्या चौथ्या फेरीमध्ये मोठी भरारी घेतली आहे. ३.२९ सीजीपीएसह ए-प्लस ग्रेड मिळाला आहे. २०१६ मध्ये झालेल्या नॅक मूल्यांकनात कॉलेजला ए ग्रेड मिळाला होता. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा त्याग, ध्येयातून उभा राहिलेल्या विवेकानंद कॉलेजने उत्तम प्रगती केली आहे. कॉलेजचा यशाचा आलेख असाच पुढे चालत राहावा, अशी भावना संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी व्यक्त केली.

प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, आयक्यूएसी समन्वयक प्रा. डॉ. श्रुती जोशी, नॅक स्टेअरिंग कमिटीचे प्रमुख प्रा डॉ. एस. आर. कट्टीमनी यांचा यशात मोठा वाटा आहे. संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

04/11/2024

सकाळ
कोल्हापूर, शनिवार, २ नोव्हेंबर २०२४

# विकासाच्या गाडीला हवा 'सुविधांचा बुस्टर'

## निधीबाबत योग्य नियोजनासह अंमलबजावणीची आवश्यकता

विकासवाट
पायाभूत सुविधा
उदयसिंग पाटील

**जिल्ह्यातील विकासाची गाडी वेगाने धावायची असेल तर पायाभूत सुविधांचे जाळे निर्माण करण्याबरोबरच ते सक्षम ठेवले पाहिजे. पण, सध्या गावपातळीपासून महापालिकांपर्यंत केवळ दाखविण्यासाठीच्या सुविधा दिल्या जात आहेत. त्यातून नागरिकांना पूर्ण समाधान होत नाही. नागरिकांच्या आरोग्य संवर्धनाबरोबरच आर्थिक विकासाच्यादृष्टीने पाहिले तर मोठ्या प्रमाणावर काम करण्याची गरज आहे. विकास प्राधिकरणाची स्थापना झाली. पण, त्यातून विकास करण्यासाठी लागणाऱ्या निधीबाबत तरतूद नसल्याने हा अर्धवट प्रकार काहीच उपयोगाचा होत नाही. त्यामुळे निधीचे नियोजन-उपलब्धता, योग्य अंमलबजावणीची नितांत आवश्यकता असून, योग्य यंत्रणाही नेमली पाहिजे.**



"शहरातील तसेच विविध ठिकाणांच्या पर्यटनस्थळांवरील पायाभूत सुविधांची अवस्था पाहिली तर पुन्हा ते पर्यटक येण्याचे धाडस करणार नाहीत. याकरिता लोकप्रतिनिधींबरोबरच अधिकाऱ्यांनी ठोस प्रयत्न केले पाहिजेत. जिथे ज्या सुविधांची गरज आहे, त्याचसाठी निधी मंजूर करून ती कामे वेळेत संपविण्याचे प्रयत्न हवेत. दळणवळणातील रस्ते हा प्रमुख घटक आहे. त्यांचे नियोजन व्यवस्थित केले तर जिल्ह्यातील विकासाला गती येईल. सांडपाणी प्रक्रिया तसेच त्याचे वहन ही व्यवस्था शासकीय यंत्रणेनेच उभी केली तर त्यात सुसूत्रता येऊन सध्या येत असलेले विविध अडथळे दूर करता येतील.

**- राजीव परीख,**
माजी अध्यक्ष, क्रिडाई महाराष्ट्र



"शहरातील विकास आराखड्यातील केवळ ५० टक्क्यांवर प्रस्तावित रस्ते झाले आहेत. यामुळे नवीन सुविधा उपलब्ध नसल्याने सध्याच्या रस्त्यांवर ताण येत आहे. अनेक ठिकाणी अतिक्रमणे होत आहेत. त्यासाठी रस्त्यांचे मार्किंग झाले तर त्याला काही प्रमाणात आळा बसेल. याचपद्धतीने तालुकास्तरावर सुविधांचे जाळे तयार करायला हवे. पर्यटन हा जिल्ह्याच्या प्रगतीत मोठा घटक ठरू शकतो. पण, सध्या तिथपर्यंत पोहोचता येत नाही किंवा पोहोचल्यानंतर समाधान मिळू शकत नाही, अशी पर्यटनस्थळांची अवस्था आहे. याकरिता विकास आराखडा फार महत्त्वाचा आहे.

**-विद्यानंद बेडेकर,**
सेक्रेटरी, क्रिडाई महाराष्ट्र



"कोल्हापूरच्या पायाभूत विकासासाठी लोकप्रतिनिधी आणि मतदारांनी सकारात्मक विचारसरणीचा अवलंब केला पाहिजे. जिल्ह्यामध्ये मोठे औद्योगिक प्रकल्प येण्यासाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. विकास आराखडा तयार करत असताना धरणातील गाळांचा विचार करावा लागेल. तसेच पर्यटन आराखडाही नियोजनपूर्वक राबविणे गरजेचे आहे. कला व क्रीडा पंढरी अशी असलेली ओळख जपण्यासाठीही त्याबाबतच्या सुविधांसाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतील.

**डॉ. सुनील भोसले,**
विवेकानंद कॉलेज

### प्रश्न

- रस्ते विकास, शहर हद्दवाढीला होणारा विरोध
- शहरानजीक साठत चाललेला कचरा
- धरणातील गाळांमुळे महापुराच्या तीव्रतेचा धोका
- खासगी सांडपाणी प्रकल्पातील पाणी सोडायचे कुठे?
- थेट पाईपलाईन योजनेतील पाणी वितरणात अडथळे

### सद्यःस्थिती

- सुविधांबाबतच्या उभारणीत प्रशासन उदासीन
- जुन्या सेवा वाहिन्यांचे आयुर्मान संपलेले
- अरुंद रस्त्यांमुळे वाहतूक कोंडीची समस्या
- विकास प्राधिकरणाची अवस्था हातपाय बांधलेली
- शहर वाढण्यास राजकीय पातळीवर विरोध

### उपाययोजना

- रस्त्यांच्या उभारणीसाठी प्राधान्य हवे
- रस्त्यांच्या जागा संपादनासाठी योग्य मोबदला द्यावा
- ग्रामीणच्या सांडपाण्यावर प्रभावी उपाययोजना हवी
- घनकचरा प्रकल्पांची मोठ्या संख्येने उभारणी आवश्यक
- विकास आराखडा राबविण्यासाठी स्वतंत्र अधिकारी नेमावेत

पुढारी | १२
मंगळवार, ५ नोव्हेंबर २०२४



कोल्हापूर : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फेन्सिंग (तलवारबाजी) स्पर्धेसाठी रवाना झालेला शिवाजी विद्यापीठाचा मुला-मुलींचा संघ. सोबत प्रशिक्षक-मार्गदर्शक.

# विद्यापीठाचा तलवारबाजीचा संघ रवाना

**कोल्हापूर :** जम्मू विद्यापीठ येथे होणाऱ्या अखिल भारतीय पुरुष व महिला फेन्सिंग (तलवारबाजी) आंतरविद्यापीठ स्पर्धांसाठी शिवाजी विद्यापीठाचा पुरुष व महिला संघ रवाना झाला. ईपी, सेबर व फॉईल या प्रकारांमध्ये संघातील खेळाडू सहभागी होणार आहेत. संघात वंदना शर्मा (श्रीमती अक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी), यशश्री कदम, श्लोका शिंदे, श्रुती पटेल व श्रीशैल शिंदे (विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूर), समृद्धी साळुंखे (जयसिंगपूर महाविद्यालय), अपूर्वा शिंदे (दत्ताजीराव इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूट इचलकरंजी), अथर्व कर्नाळे (शिवराज महाविद्यालय गडहिंग्लज), श्रावण काटकर (तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट वारणानगर), मानसी माळी, रितेश पोवार, श्रद्धा पोवार (महावीर महाविद्यालय कोल्हापूर), श्रीनिवास पाटील (गणपतराव आरवाडे कॉलेज सांगली), अथर्व यादव (नेमगोंडा दादा पाटील नाईट कॉलेज सांगली), अवधूत पाटील (अण्णासाहेब डांगे कॉलेज आष्टा), आर्यन पवार (श्रीमती कस्तुरबाई वालचंद कॉलेज सांगली), सार्थक डेरे (किसन वीर महाविद्यालय वाई), सानिका मोरे (शहाजी महाविद्यालय), सानिका हराळे (गंगाबाई खिवराज घोडावत कन्या महाविद्यालय जयसिंगपूर) यांचा समावेश आहे. सर्वांना डॉ. धनंजय पाटील (आजरा महाविद्यालय), प्रफुल्ल धुमाळ आदींचे मार्गदर्शन लाभत आहे.

सकाळ
कोल्हापूर, मंगळवार, ५ नोव्हेंबर २०२४

# विद्यापीठाचे संघ जम्मूला रवाना

## तलवारबाजी स्पर्धेसाठी पुरुष, महिला संघांची निवड

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ४ : जम्मूमधील जम्मू विद्यापीठात ५ ते १० नोव्हेंबर दरम्यान होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ पुरुष व महिला फेन्सिंग (तलवारबाजी) स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचे पुरुष व महिला संघ आज रवाना झाले.

ईपी, सेबर, फॉईल या प्रकारांत निवड झालेले खेळाडू असे : वंदना शर्मा (आक्काताई रामगोंडा कन्या महाविद्यालय, इचलकरंजी), यशश्री कदम, श्लोका शिंदे, श्रीशैल शिंदे (विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर), समृद्धी साळुंखे (जयसिंगपूर महाविद्यालय), अपूर्वा शिंदे (डीकेटीई, इचलकरंजी), श्रुती पटेल (विवेकानंद कॉलेज), अथर्व कर्नाळे (शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज), श्रावण काटकर (तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, वारणानगर), मानसी माळी, रितेश पोवार (महावीर कॉलेज), श्रीनिवास पाटील (गणपतराव आरवाडे कॉलेज ऑफ कॉमर्स, सांगली), श्रद्धा पोवार (महावीर कॉलेज), अथर्व यादव (नेमगोंडा दादा पाटील नाईट कॉलेज, सांगली), अवधूत पाटील (अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, आष्टा), आर्यन पवार (श्रीमती कस्तुरबाई वालचंद कॉलेज, सांगली), सार्थक ढेरे (किसन वीर महाविद्यालय, वाई), सानिका मोरे (शहाजी कॉलेज, कोल्हापूर), सानिका हराळे (घोडावत कन्या महाविद्यालय, जयसिंगपूर).

खेळाडूंना डॉ. धनंजय पाटील व प्रफुल्ल धुमाळ यांचे प्रशिक्षण, तर शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन लाभले.




कोल्हापूर : जम्मू येथे होणाऱ्या आंतरविद्यापीठीय तलवारबाजी स्पर्धेसाठी सोमवारी रवाना झालेल्या महिला व पुरुष संघांसोबत डॉ. शरद बनसोडे, धनंजय पाटील, प्रफुल्ल धुमाळ उपस्थित होते.

तरुण भारत
मंगळवार ५ नोव्हेंबर २०२४

# फेन्सिंग स्पर्धेसाठी विद्यापीठाचा संघ रवाना

- ५ ते १० नोव्हेंबर दरम्यान जम्मू विद्यापीठात होणार स्पर्धा

प्रतिनिधी
कोल्हापूर

जम्मू विद्यापीठ जम्मू येथे ५ ते १० नोव्हेंबर दरम्यान होणाऱ्या अखिल भारतीय पुरुष व महिला फेन्सिंग (तलवारबाजी) विद्यापीठ स्पर्धांसाठी शिवाजी विद्यापीठाचे पुरुष व महिला संघ रवाना झाले आहेत.

रवाना झालेल्या खेळाडूंमध्ये वंदना शर्मा श्रीमती अक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी, यशश्री कदम विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर, श्लोका शिंदे विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूर, श्रीशैल शिंदे विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूर, समृद्धी साळुंखे जयसिंगपूर महाविद्यालय, जयसिंगपूर, अपूर्वा शिंदे दत्ताजीराव कदम टेक्सटाईल अँड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूट,इचलकरंजी, श्रुती पटेल विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, अथर्व कर्नाळे शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज, श्रावण काटकर तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी वारणानगर, मानसी माळी, रितेश पोवार महावीर महाविद्यालय कोल्हापूर, श्रीनिवास पाटील सांगली, श्रद्धा पोवार महावीर महाविद्यालय, कोल्हापूर, अथर्व यादव नेमगोंडा दादा पाटील नाईट कॉलेज ऑफ आर्टस अँड कॉमर्स सांगली, अवधूत पाटील अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, आष्टा, आर्यन पवार श्रीमती कस्तुरबाई वालचंद कॉलेज सांगली, सार्थक डेरे किसन वीर महाविद्यालय वाई, सानिका मोरे शहाजी महाविद्यालय, सानिका हराळे श्रीमती गंगाबाई खिवराज घोडावत कन्या महाविद्यालय, जयसिंगपूर.




**कोल्हापूर : जम्मू येथील अखिल भारतीय फेन्सिंग स्पर्धेसाठी रवाना झालेला शिवाजी विद्यापीठाचा संघ.**

# हॅलो प्रभात

# नॅक मुल्यांकनामध्ये विवेकानंद कॉलेजचे 'दैदिप्यमान यश...'

कोल्हापूर : हॅलो प्रभात

येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (अधिकारप्रदत्त स्वायत्त) या महाविद्यालयास दिनांक १४ व १५ ऑक्टोबर, २०२४ रोजी नॅक 4th cycle साठी नॅक पिअर टीमने भेट दिली. या समितीचे प्रमुख संबळपूर विद्यापीठ, ओरिसाचे माजी कुलगुरु प्रोफेसर बिष्णू चरण बरीक हे होते तर समितीचे समन्वयक अलिगड मुस्लीम विद्यापीठ, उत्तरप्रदेश मधील कॉमर्स विभागप्रमुख व माजी डीन डॉ. नवाब अली खान व समितीचे सदस्य एम. जी. सायन्स इन्स्टिटयुट, अहमदाबाद, गुजरातचे प्राचार्य डॉ. भानूकुमार जैन यांचा समावेश होता.




विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये आणि स्वायत्त महाविद्यालये यांच्या मुल्यांकनामध्ये वेगळेपण असते. स्वायत्त महाविद्यालयाचे मुल्यांकन हे विद्यापीठाच्या मुल्यांकनासारखे असते. अशावेळी गुणवत्ता टिकवून ठेवणेसुद्धा कठीण असते. असे असतानाही अधिकारप्रदत स्वायत असणाऱ्या विवेकानंद कॉलेजने आपल्या गुणवत्तेमध्ये वाढ करून राष्ट्रीय मुल्यांकन आणि प्रत्यायन परिषद (नॅक) च्या 4th cycle मध्ये मोठी भरारी घेऊन 3.29 CGPA सह A+ ग्रेड मिळविलेली आहे. सन २०१६ मध्ये झालेल्या नॅक 3rd Cycle मध्ये विवेकानंद कॉलेजला 3.24 CGPA सह A ग्रेड मिळालेली होती. त्यानंतर महाविद्यालयाने स्वायत होण्याचा बहुमान पटकावला होता.

Global Times 17-11-2024

# भूमिका पाटीलची राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड

**कोल्हापूर :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत व जिल्हा क्रीडा कार्यालय, छत्रपती संभाजीनगर आयोजित छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेत १९ वर्षाखालील गटामध्ये विवेकानंद कॉलेजमधे १२वी सायन्समध्ये शिकत असलेली भूमिका पाटील हिने सुवर्ण पदक मिळविले. तिची महाराष्ट्र संघात निवड झाली आहे.

या स्पर्धेत एकूण ८ विभागातील (नागपूर, पुणे, मुंबई, सोलापूर, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती, नाशिक) खेळाडू सहभागी झाले होते. या सर्व खेळाडूंमधून भूमिकाने सेबर व एपी प्रकारात सुवर्ण पदक मिळविले.

भूमिकाला श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, कनिष्ठ विभाग जिमखाना प्रमुख प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे व रजिस्ट्रार आर. बी. जोग, सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.



तरुण भारत
रविवार १७ नोव्हेंबर २०२४

# राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेसाठी भूमिका पाटीलची महाराष्ट्र संघात निवड



**कोल्हापूर : तलवारबाजी स्पर्धेच्या महाराष्ट्र संघात निवड झाल्याबद्दल भुमिका पाटीलच्या सत्कारप्रसंगी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार. सोबत डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले आदी.**

प्रतिनिधी
कोल्हापूर

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत व जिल्हा क्रीडा कार्यालय, छत्रपती संभाजीनगर आयोजित छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेत १९ वर्षाखालील गटामध्ये विवेकानंद कॉलेजच्या भूमिका पाटीलने सुवर्णपदक मिळविले. या स्पर्धेत एकूण ८ विभागातील (नागपूर, पुणे, मुंबई, सोलापूर, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती, नाशिक) खेळाडू सहभागी झाले होते. तरी या सर्व खेळाडू मधून भुमिकाने सेबर व एपी प्रकारात सुवर्णपदक मिळविले. भूमिकाची राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. तिला स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अध्यक्ष कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, कनिष्ठ विभाग जिमखाना प्रमुख प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे व कुलसचिव आर. बी. जोग, सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

18/11/2024

18.11.24

11.24

पुढारी MY कोल्हापूर रविवार, १७ नोव्हेंबर २०२४

# विवेकानंद कॉलेजतर्फे मतदान जनजागृती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विवेकानंद महाविद्यालयाच्या वतीने समाजातील मतदारांमध्ये 'माझे मत, माझा अधिकार' याची जाणीव करून देण्यासाठी व मतदानाचे पवित्र कर्तव्य बजाविण्यासाठी नागळा पार्क ते विवेकानंद कॉलेज अशी मतदान जनजागृती मोहीम राबविण्यात आली. यास नागरिकांचा प्रतिसाद लाभला.

प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते मतदान जनजागृती मोहिमेचे उद्घाटन झाले. विवेकानंद कॉलेज कोल्हापूर व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मताचे महत्त्व पटवून देण्यासाठी विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या घोषणांच्या ब्रीद वाक्यांच्या माध्यमातून समाजामध्ये मतदान करणे पवित्र कर्तव्य कसे आहे? हे मतदारांना पटवून दिले. कॉलेजचे प्रबंधक आर. बी. जोग, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. एल एस नाकाडी, प्रा. आर. व्ही. घाटगे, प्रा. जी. एस. साळुंखे, प्रा. एस. एस. जगताप, प्रा. एस. पी. पंचभाई, प्रा. सी. सी. पाटील, विद्यार्थी सहभागी झाले होते.

पुढारी MY कोल्हापूर सोमवार, १८ नोव्हेंबर २०२४

# जलतरण स्पर्धेत विवेकानंद कॉलेजची उल्लेखनीय कामगिरी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे, बालेवाडी (पुणे) येथे झालेल्या राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेमध्ये विवेकानंद कॉलेजच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी करीत जलतरण स्पर्धेत वर्चस्व राखले.

सांघिक जलतरण रिले क्रीडा प्रकारात १९ वर्षांखालील मुली व मुले १०० X ४ मिडले रिले व १०० X ४ फ्री रिलेमध्ये रौप्यपदक मिळवले. वैयक्तिक जलतरण क्रीडा प्रकारात कृष्णा शेळकेने शंभर मीटर बॅकस्ट्रोकमध्ये कांस्यपदक तर ४०० मीटर फ्री स्टाईलमध्ये रौप्यपदक पटकावले. धिरीजा मोरेने २०० मीटर बॅक स्ट्रोकमध्ये रौप्यपदक व ४०० मीटर फ्री स्टाईल प्रकारात कांस्यपदक पटकावले. श्रीवर्धन पाटील, जय शहा यांनीही यश संपादन केले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, ज्युनिअर जिमखाना विभाग प्रमुख प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, रजिस्ट्रार आर. बी. जोग, सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

18/11/2024

18.11.24

२ पुण्य नगरी ▮ बुधवार, २७ नोव्हेंबर २०२४

# विवेकानंद कॉलेजमध्ये संविधान दिन

**कोल्हापूर :** येथील विवेकानंद महाविद्यालयात मंगळवारी संविधान दिनानिमित्त भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते करण्यात आले.

संविधान हा देशाचा मूळ कायदा असतो. त्याचे रक्षण करणे नागरिकांची जबाबदारी आहे. देशामध्ये स्वातंत्र्य, समता व बंधूता जोपासणे संविधानामुळे शक्य झाले आहे, असे मत प्रा. समिक्षा फराकटे यांनी मांडले. यावेळी एन.सी.सी.प्रमुख कॅप्टन सुनीता भोसले, डॉ. कैलास पाटील, प्रा. शिल्पा भोसले, प्रा. दत्तात्रय जाधव, प्रा. अवधूत टिपुगडे, डॉ. जी. एस. उबाळे, रजिस्ट्रार आर. बी. जोग, तसेच प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी एन.सी.सी. कॅडेट उपस्थित होते.

27/11/2024

27-11-2024

सकाळ

गुरुवार, २८ नोव्हेंबर २०२४



कोल्हापूर : शासकीय महापालिकास्तर थ्रो बॉल स्पर्धेत चौदा, सतरा, एकोणीस वर्षांखालील विजेत्या संघांसोबत मान्यवर उपस्थित होते.

# बावडेकर ॲकॅडमी, विवेकानंद विजयी

## शासकीय महापालिकास्तर शालेय थ्रो बॉल स्पर्धा

■ **सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २७ : जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व महापालिका प्राथमिक शिक्षण विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या थ्रो बॉल स्पर्धेत चौदा व सतरा वयोगटांत श्रीमंत माईसाहेब बावडेकर ॲकॅडमी, तर एकोणीस वर्षांखालील वयोगटात विवेकानंद कॉलेजने प्रतिस्पर्धी संघावर मात करीत विजेतेपद पटकाविले.

छत्रपती संभाजीनगरातील विभागीय क्रीडा संकुलात झालेल्या या स्पर्धेत चौदा वर्षांखालील मुलांमध्ये श्रीमंत माईसाहेब बावडेकर ॲकॅडमी स्कूलने राजर्षी शाहू हायस्कूल रिंगरोडचा १५-१, १५-१ अशा गुणांनी पराभव करीत विजेतेपद मिळवले. विजयी संघात वेदांत पावले, ईहान बागवान, वेदांत जाधव, राजवीर डकरे, यश जाधव, पवन सावदे, नमन चिवळकर, ज्ञान शेट्टी, जन्मजय निंबाळकर, आराध्य यादव, अर्णव राबाडे, आरुष पवार, क्रीडा शिक्षक ऋषीकेश पाटील यांचा समावेश होता. तिसरा क्रमांक आर. के. वालावलकर हायस्कूलने पटकाविला.

सतरा वर्षांखालील मुलांमध्ये श्रीमंत माईसाहेब बावडेकर ॲकॅडमी स्कूलने राजर्षी शाहू हायस्कूल रिंग रोडचा १५-१०, १५-७ असा पराभव केला, तर तिसरा क्रमांक वसंतराव देशमुख सेकंडरी इंग्लिश स्कूलने पटकाविला.

विजयी संघात इंद्रनील वेल्हाळ, तन्मय मंडपे, श्लोक वाडकर, प्रसाद पवार, शार्विल रेगे, रुजुल फडणवीस, यश उत्पे, तुषार सालियर, तनिष्क खांडेकर, जयदीप आजगेकर, गुरुराज खांडेकर, अनिमेश देसाई यांचा समावेश होता.

एकोणीस वर्षांखालील मुलांमध्ये विवेकानंद कॉलेजने माईसाहेब बावडेकर माध्यमिक हायस्कूलचा १५-९, १५-६ असा पराभव करीत विजेतेपद मिळवले. विजयी संघात पार्थ जाधव, स्वयंम जिरगे, सोहम भोसले, सिद्धेश जगताप, सर्वेश पाटील, वृषभ पवार, मंत्र लोहार, प्रणव तळप, पार्श्वनाथ मगदूम, श्रीहरी पवार, धनराज सूर्यवंशी, शौर्य लिंग्रस, क्रीडाशिक्षक प्रा. संतोष कुंडले यांचा समावेश होता.

तरुण भारत संवाद गुरुवार, २८ नोव्हेंबर २०२४

# माईसाहेब बावडेकर ॲकॅडमी, विवेकानंद कॉलेज विजयी

- मनपास्तरीय थ्रो बॉल स्पर्धा



कोल्हापूर : मनपास्तर थ्रो बॉल स्पर्धेतील विजयी संघासोबत क्रीडा निरीक्षक सचिन पांडव, ऋषिकेश पाटील आदी.

**प्रतिनिधी**

कोल्हापूर

कोल्हापूर महानगरपालिका प्राथमिक शिक्षण समिती, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आयोजित मनपास्तरील शालेय थ्रो बॉल स्पर्धा संपन्न झाल्या. छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुल येथे स्पर्धा पार पडल्या. १४ व १७ वर्षाखालील सामन्यात श्रीमंत माईसाहेब बावडेकर ॲकॅडमी स्कूलने तर १९ वर्षाखालील सामन्यात विवेकानंद कॉलेजने विजय मिळविला. मनपा प्रशासक के. मंजुलक्ष्मी यांचे अध्यक्षतेखाली व जिल्हा क्रीडा अधिकारी नीलिमा अडसूळ, उपआयुक्त साधना पाटील, प्रशासनाधिकारी आर. व्ही. कांबळे यांच्या मार्गदर्शनानुसार क्रीडा निरीक्षक सचिन पांडव, ऋषीकेश पाटील यांनी आयोजन केले.

स्पर्धेचा निकाल असा :

**१४ वर्षाखालील सामना :** सेमी १ – राजर्षी शाहू हायस्कूल रिंग रोड विजयविरुद्ध आर.के.वालावलकर हायस्कूल १५–५,१५–०, सेमी २ – श्रीमंत माईसाहेब बावडेकर अकॅडमी स्कूल विजयविरुद्ध श्रीमंत माईसाहेब बावडेकर माध्यमिक विद्यालय १५–३, १५–०, तृतीय क्रमांक सामना : श्रीमंत माईसाहेब बावडेकर माध्यमिक विद्यालय विजयविरुद्ध आर के वालावलकर हायस्कूल १५–४, १५–२ **अंतिम सामना :** श्रीमंत माईसाहेब बावडेकर अकॅडमी स्कूल विजय विरुद्ध राजर्षी शाहू हायस्कूल रिंग रोड १५–१,१५–१

**विजयी संघ असा :** वेदांत पावले, ईहान बागवान, वेदांत जाधव, राजवीर डकरे, यश जाधव, पवन सावदे, नमन चिवळकर, ज्ञान शेट्टी, जन्मजय निंबाळकर, आराध्य यादव, अर्णव राबाडे, आरुष पवार, क्रीडा शिक्षक ऋषिकेश पाटील.

**१७ वर्षाखालील सामना :** सेमी १ – श्रीमंत माईसाहेब बावडेकर अकॅडमी स्कूल विजयविरुद्ध व. ज. देशमुख सेकंडरी इंग्लिश स्कूल १५–१०,१५–७, सेमी २ – राजर्षी शाहू हायस्कूल रिंग रोड विजय विरुद्ध राधाबाई शिंदे इंग्लिश मीडियम स्कूल १५–९,१५–५, तृतीय क्रमांक सामना : व. ज. देशमुख सेकंडरी इंग्लिश स्कूल विजयविरुद्ध राधाबाई शिंदे इंग्लिश मीडियम स्कूल १५–३, १५–३.

**अंतिम सामना :** श्रीमंत माईसाहेब बावडेकर अकॅडमी स्कूल विजयविरुद्ध राजर्षी शाहू हायस्कूल रिंग रोड १५–३, १५–२.

**विजयी संघ असा :** इंद्रनील वेल्हाळ, तन्मय मंडपे, प्रसाद पवार, श्लोक वाडकर, शर्विल, रेगे रुजूल फडणवीस यश उलपे तुषार सालियर तनिष्क खांडेकर जयदीप आजगेकर गुरुराज खांडेकर अनिमेश देसाई क्रीडा शिक्षक ऋषिकेश पाटील.

**१९ वर्षाखालील सामना :** सेमी १ – विवेकानंद कॉलेज विजयविरुद्ध माईसाहेब बावडेकर अकॅडमी स्कूल १५–१, १५–१ अंतिम सामना : विवेकानंद कॉलेज विजयविरुद्ध माय साहेब बावडेकर माध्यमिक हायस्कूल १५–९, १५–६.

**विजयी संघ असा :** पार्थ जाधव, स्वयंम जीरगे, सोहम भोसले, सिद्धेश जगताप, सर्वेश पाटील, वृषभ पवार, मंत्र लोहार, प्रणव तळप, पार्श्वनाथ मगदूम, श्रीहरी पवार धनराज सूर्यवंशी शौर्य लिंग्रस क्रीडा शिक्षक प्रा.संतोष कुंडल.

28/11/2024

29.11.24

हॅलो प्रभात

# विवेकानंदच्या फिल्म मेकींग विद्यार्थ्यांची निवड

कोल्हापूर : हॅलो प्रभात

येथील महाविद्यालयाच्या बी. व्होक.ॲनिमेशन अँड फिल्म मेकींग पदवी अभ्यासक्रमामध्ये शिकत असणाऱ्या एकूण पाच विद्यार्थ्यांची मुंबईच्या डायलॉग्ज मेडिया या कंपनीमध्ये स्क्रीप्ट् रायटींग आणि सिनेमॅटोग्राफी या पदासाठी निवड झाली आहे.

सदर विद्यार्थ्यांना पाच लाख रुपयाचे पॅकेज जाहीर झाले आहे. या विद्यार्थ्यांना बी. व्होक. ॲनिमेशनचे शिक्षण घेतानाच नोकरीची संधी उपलब्ध झाली आहे. सदर विद्यार्थ्यांची नांवे खालीलप्रमाणे आहेत. दिग्वीजय पाटील, कामया खातिब, कु. संहिता मोरे, कु.ऋचा बराडे, सुमित इंगळे या सर्व विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.



आर. कुंभार यांनी अभिनंदन केले असून त्यांना बी. व्होक. विभागाच्या नोडल ऑफिसर डॉ. श्रुती जोशी व विभागप्रमुख प्रा. महेश माळी, प्रा. निखिल शिंगे, प्रा. अतुल पाटील, प्रा. अनिकेत कोरे , महाविद्यालयाचे रजिस्ट्रार आर. बी. जोग यांचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी MY कोल्हापूर शुक्रवार, २९ नोव्हेंबर २०२४

# माईसाहेब बावडेकर, 'विवेकानंद'ला विजेतपद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मनपा स्तर शासकीय शालेय मुलींच्या थ्रो बॉल स्पर्धेच्या १४ व १७ वयोगटांत श्रीमंत माईसाहेब बावडेकर ॲकॅडमी स्कूलने, तर १९ वयोगटात विवेकानंद ज्युनिअर कॉलेज संघाने विजेतेपद पटकाविले. जिल्हा क्रीडा कार्यालय व मनपा प्राथमिक शिक्षण विभाग आयोजित ही स्पर्धा छत्रपती संभाजीनगर विभागीय क्रीडा संकुलावर सुरू आहे.



**कोल्हापूर : मनपा स्तर शालेय थ्रो बॉल स्पर्धेच्या मुलींच्या गटात १४ व १७ वयोगटांत अजिंक्यपद पटकाविणारे श्रीमंत माईसाहेब बावडेकर स्कूलचे संघ आणि १९ वयोगटात विजेतेपद पटकाविणारा विवेकानंद कॉलेजचा संघ. सोबत प्रशिक्षक, मार्गदर्शक, संयोजक.**

स्पर्धेच्या १४ वयोगटाच्या अंतिम सामन्यात श्रीमंत माईसाहेब बावडेकर ॲकॅडमी स्कूलने आर. के. वालावलकर प्रशालेचा १५-१, १५-१ असा एकतर्फी पराभव केला. विजयी संघात अनुष्का आयरेकर, आफिया मुन्शी, प्रणाली चौगुले, सिद्धी पाटील, साची मेहता, नारायणी पाटील, काव्यांजली मोहिते, फरीन मोमीन, तन्वी पाटील, आर्या वाडेकर, आराध्या काशीद, तनवी माणगावे यांचा समावेश आहे.

१७ वयोगटाच्या अंतिम सामन्यात श्रीमंत माईसाहेब बावडेकर ॲकॅडमी स्कूलने आर. के. वालावलकर प्रशालेवर १५-१, १५-१ अशी मात केली. विजेतेपद पटकाविणाऱ्या संघात अनघा बोराटे, सिद्धी सुतार, सानवी बागल, सई

## मनपा स्तर शालेय मुलींच्या थ्रो बॉल स्पर्धा

ठाकूर, श्रागवी मिश्रा, प्रियल शहा, शौर्य टकळकी, धनश्री पाटील, ओवी बेंद्रे, हर्षिता साळुंखे, इशिता कांबळे यांचा समावेश आहे. १९ वयोगटाच्या अंतिम सामन्यात विवेकानंद कॉलेजने माईसाहेब बावडेकर ॲकॅडमीचा १५-३, १५-६ असा पराभव केला. विजयी संघात श्रेया मालाई, वेदिका पाटील, वेदिका सोळांगुरे, सृष्टी आंबे, प्रांजल पिसे, तनिष्का पाटील, जानवी काशीद, गौरी कोळी, किना फर्नांडिस, ऋत्वी पाटील, अनुष्का झेंडे, प्रियदर्शनी गुरव यांचा समावेश आहे.

# ‘विवेकानंद’मधील बी.व्होक. ॲनिमेशन अँड फिल्म मेकिंगच्या विद्यार्थांची निवड

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयाच्या बी.व्होक. ॲनिमेशन अँड फिल्म मेकिंग पदवी अभ्यासक्रमामध्ये शिकत असणाऱ्या पाच विद्यार्थ्यांची मुंबई येथील खासगी कंपनीमध्ये स्क्रिप्ट रायटिंग व सिनेमॅटोग्राफी पदासाठी निवड झाली आहे. दिग्विजय पाटील, कामया खातिब, संहिता मोरे, ऋचा बराडे, सुमित इंगळे या विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी अभिनंदन केले. त्यांना बी.व्होक. विभागाच्या नोडल ऑफिसर डॉ. श्रुती जोशी, विभागप्रमुख प्रा. महेश माळी, प्रा. निखिल शिंगे, प्रा. अतुल पाटील, प्रा. अनिकेत कोरे, रजिस्ट्रार आर. बी. जोग यांचे मार्गदर्शन लाभले.

तरुण भारत संवाद

शनिवार, ३० नोव्हेंबर २०२४

# थ्रो बॉल स्पर्धेत बावडेकर, विवेकानंद विजयी



कोल्हापूर : मनपास्तर मुलींच्या थ्रो बॉल स्पर्धेतील विजयी संघासोबत क्रीडा निरीक्षक सचिन पांडव, ऋषीकेष पाटील आदी.

प्रतिनिधी
कोल्हापूर

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण समिती, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्यावीतने आयोजित मनपास्तर शासकीय शालेय मुलींच्या थ्रो बॉल स्पर्धेत १४ व १७ वर्षाखालील गटात श्रीमंत माईसाहेब बावडेकर अकॅडमी स्कूलने प्रथम क्रमांक मिळविला. तर १९ वर्षाखालील गटात विवेकानंद कॉलेजने विजय मिळविला.

छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुल येथे या स्पर्धा झाल्या. मनपा प्रशासक के मंजुलक्ष्मी, जिल्हा क्रीडाअधिकारी नीलिमा अडसूळ, उपआयुक्त साधना पाटील, प्रशासनाधिकारी आर. व्ही. कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले. स्पर्धेचे आयोजन क्रीडा निरीक्षक सचिन पांडव, ऋषीकेश पाटील यांनी केले.

**स्पर्धेचा निकाल असा :**

**१४ वर्ष मुली निकाल :** सेमी १ – आर. के. वालावलकर प्रशाला विजय विरुद्ध राजर्षी शाहू हायस्कूल रिंग रोड १५–२,१०–१५,१५–५, सेमी २ – श्रीमंत माईसाहेब बावडेकर अकॅडमी स्कूल विजयविरुद्ध श्रीमंत माईसाहेब बावडेकर माध्यमिक विद्यालय १५–४,१५–६, तृतीय क्रमांक सामना : श्रीमंत माईसाहेब बावडेकर माध्यमिक विद्यालय विजयविरुद्ध राजर्षी शाहू हायस्कूल रिंग रोड १५–३,१५–३.

**अंतिम सामना :** श्रीमंत माईसाहेब बावडेकर अकॅडमी स्कूल विजयविरुद्ध आर के वालावलकर प्रशाला १५–१,१५–१

**विजयी संघ असा :** अनुष्का आयरेकर आफिया मुंशी प्रणाली चौगुले सिद्धी पाटील साची मेहता नारायणी पाटील काव्यांजली मोहिते फरीन मोमीन तन्वी पाटील आर्या वाडेकर आराध्या काशीद तनवी मानगावे क्रीडा शिक्षक ऋषिकेश पाटील

**१७ वर्ष मुली निकाल :** सेमी १ – माईसाहेब बावडेकर अकॅडमी स्कूल विजयविरुद्ध आर. के. वालावलकर प्रशाला १५–६,१५–४, सेमी २ – माईसाहेब बावडेकर माध्यमिक विद्यालय विजयविरुद्ध राजर्षी शाहू हायस्कूल रिंग रोड १५–३,१५–३, तृतीय क्रमांक सामना : राजर्षी शाहू हायस्कूल रिंग रोड विजय विरुद्ध आर के वलावलकर प्रशाला १५–४,१५–५

**अंतिम सामना :** श्रीमंत माईसाहेब बावडेकर अकॅडमी स्कूल विजयविरुद्ध माईसाहेब बावडेकर माध्यमिक विद्यालय १५–१३,१२–१५,१५–४.

**विजयी संघ असा :** अनघा बोराटे सिद्धी सुतार सानवी बागल सई ठाकूर श्रागवी मिश्रा प्रियल शहा शौर्य टकळकी धनश्री पाटील ओवी बेंद्रे हर्षिता साळुंखे इशिता कांबळे ,ऋषिकेश पाटील

## ■ मनपास्तरीय १४,१७,१९ वर्षाखालील मुलींची थ्रो बॉल स्पर्धा

**१९ वर्ष मुली निकाल :** सेमी १ – विवेकानंद कॉलेज विजयविरुद्ध माईसाहेब बावडेकर अकॅडमी स्कूल १५–६,१५–७,

**अंतिम सामना :** विवेकानंद कॉलेज विजयविरुद्ध माय साहेब बावडेकर अकॅडमी १५–३,१५–६

**विजयी संघ असा :** श्रेया मालाई वेदिका पाटील वेदिका सोळांगुरे सृष्टी आंबे प्रांजल पिसे तनिष्का पाटील जानवी काशीद गौरी कोळी किना फर्नांडिस ऋत्वी पाटील अनुष्का झेंडे प्रियदर्शनी गुरव क्रीडा शिक्षक प्रा. संतोष

30/11/2024

30/11/24

सकाळ

कोल्हापूर, शनिवार, ३० नोव्हेंबर २०२४



कोल्हापूर : थ्रो बॉल स्पर्धेत विजयी १४, १७ वर्षांखालील माईसाहेब बावडेकर ॲकॅडमीच्या मुलींचा संघ व १९ वर्षांखालील विवेकानंद कॉलेजचा संघ.

# थ्रो बॉलमध्ये माईसाहेब बावडेकर, विवेकानंद महाविद्यालय विजयी

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २९ : मनपास्तर शासकीय शालेय मुलींची थ्रो बॉल स्पर्धा झाली. स्पर्धेत १४ व १७ वर्षे गटात माईसाहेब बावडेकर स्कूल व १९ वर्षांखालील गटात विवेकानंद कॉलेज संघांनी विजय मिळवला.

स्पर्धा छत्रपती संभाजी महाराज विभागीय क्रीडा संकुल येथे झाली. स्पर्धा आयोजन क्रीडा निरीक्षक सचिन पांडव, ऋषिकेश पाटील यांनी केले. १४ वर्षांखालील गटात अंतिम सामन्यात श्रीमंत माईसाहेब बावडेकर ॲकॅडमी स्कूल संघाने आर. के. वालावलकर प्रशाला संघावर १५-१, १५-१ असा सरळ विजय मिळवला. विजयी संघामध्ये अनुष्का आयरेकर, आफिया मुंशी, प्रणाली चौगुले, सिद्धी पाटील, साची मेहता, नारायणी पाटील, काव्यांजली मोहिते, फरीन मोमीन, तन्वी पाटील, आर्या वाडेकर, आराध्या काशीद, तनवी मानगावे, क्रीडाशिक्षक ऋषिकेश पाटील.

१७ वर्षांखालील गटात श्रीमंत माईसाहेब बावडेकर ॲकॅडमी स्कूल संघाने श्रीमंत माईसाहेब बावडेकर माध्यमिक विद्यालय संघावर १५-१३, १२-१५, १५-४ असा विजय मिळवला. विजयी संघामध्ये अनघा बोराटे, सिद्धी सुतार, सानवी बागल, सई ठाकूर, श्रागवी मिश्रा, प्रियल शहा, शौर्य टकळकी, धनश्री पाटील, ओवी बेंद्रे, हर्षिता साळुंखे, इशिता कांबळे, क्रीडाशिक्षक ऋषिकेश पाटील. १९ वर्षांखालील गटात विवेकानंद कॉलेज संघाने श्रीमंत माईसाहेब बावडेकर ॲकॅडमी संघावर १५-३, १५-६ असा विजय मिळवला. विजयी संघामध्ये श्रेया मालाई, वेदिका पाटील, वेदिका सोळांगुरे, सृष्टी आंबे, प्रांजल पिसे, तनिष्का पाटील, जानवी काशीद, गौरी कोळी, किना फर्नांडिस, ऋत्वी पाटील, अनुष्का झेंडे, प्रियदर्शनी गुरव, क्रीडा शिक्षक प्रा. संतोष कुंडले यांचा समावेश आहे.

30/11/2024

30/11/2024